दै. सकाळ दि. 15/01/2023.

# जबरी चोरी करणारे दोन चोरटे अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही; तीन लाखाचा मुद्देमाल जप्त



**नांदेड :** जबरी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या पथकाने शनिवारी अटक करून त्यांच्याकडील चोरलेला तीन लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नांदेड, ता. १४ (बातमीदार) :** जबरी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शनिवारी (ता. १४) अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरी केलेला सात मोबाईल, दोन दुचाकी व एक खंजर असा एकूण दोन लाख ९३ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी वेगवेगळी पथके तयार करून गुन्हेगारांना अटक करण्यासाठी मोहिम सुरू केला आहे. त्या अंतर्गत शनिवारी सकाळी नावघाट पुल येथे जबरी चोरी करणारे दोन आरोपी येणार असल्याची माहिती कळाल्यानंतर पथकाला पाठविण्यात आले. फौजदार दत्तात्रय काळे आणि पोलिस अंमलदार सखाराम नवघरे, गंगाधर कदम, बालाजी तेलंग, दीपक पवार, विठ्ठल शेळके, विलास कदम, गणेश धुमाळ, मारोती मोरे, महेश बडगु, राजू सिटीकर आदींनी त्या ठिकाणी सापळा रचला. त्यानंतर पथकाने इम्रान अलीम शेख (वय १९, रा. नावघाट) आणि शायद यासीन शेख (वय २०, रा. गाडीपुरा) या दोघांना पथकाने पकडून विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी भाग्यनगर आणि ग्रामिण पोलिस ठाण्यातंर्गत चोरी केल्याचे कबूल केले. त्यांच्याकडील चोरलेला दोन लाख ९३ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या दोघांना पुढील तपासकामी भाग्यनगर पोलिस ठाण्यात देण्यात आले असून आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी व्यक्त केली. या कामगिरीबाबत पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्यासह अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, खंडेराय धरणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक चिखलीकर यांनी पथकाचे कौतुक केले आहे.

दै. देशोन्नती दि. 15/01/2023.

# पहिली नॅशनल इंडियाका कप स्पर्धेत पोलिस अंमलदार भंडारे यांना सुवर्ण पदक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड.** नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या पहिली नॅशनल इंडियाका कप २०२२ - २३ स्पर्धमध्ये नांदेड पोलीस अंमलदार विनोद भंडारे यांनी सुवर्ण पदक पटकावले आहे.



सदरची स्पर्धा ही ६ ते ८ जानेवारी दरम्यान गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम क्रीडा संकुल इंडोर हॉल येथे पार पडली. सदर स्पर्धेत उत्तरप्रदेश, केरळ, छतीसगड, महाराष्ट्र, जम्मु काश्मीर आदी राज्यातील एकुण २५० स्पर्धकांनी भाग घेतला होता. सदर यशाबदल पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक आबिनाश कुमार, भोकर विभागाचे खंडेराव धरणे, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी सदर अंमलदारांचे अभिनंदन केले असुन पुढील कार्यास शुभेछा दिल्या आहेत.

दै. लोकमत. 15/01/2023.

# अंमलदार भंडारेला सुवर्ण पदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल इंडिया कप स्पर्धेमध्ये नांदेड पोलिस दलातील अंमलदार विनोद खंडूजी भंडारे यांनी सुवर्ण पदक पटकावले.



गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम येथे ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत उत्तर प्रदेश, केरळ, छत्तीसगड, महाराष्ट्र, जम्मू-कश्मीर आदी राज्यांतील अडीचशे स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या खेळाची इंटरनॅशनल स्पर्धा जर्मनी येथे होणार आहे. भंडारे यांच्या कामगिरीबद्दल त्यांचा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे, पोनि. द्वारकादास चिखलीकर यांनी सत्कार केला.